ePaper

**कॅलिफोर्नियात भारतीय वंशाच्या महिलेची हत्या; भरस्त्यातच गोळी झाडली**

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 13 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 3 वरुन...

५७ हजार विद्यार्थ्यांच्या पोषण आहाराला बळ

## पंतप्रधान मोदींचा ब्रिक्स परिषदेतून पाश्चात्य देशांना मोठा संदेश

# आम्ही कोणाच्याही विरोधात नाही

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**यंदाची १८ वी 'ब्रिक्स शिखर परिषद' दिल्लीत १२ आणि १३ सप्टेंबर २०२६ रोजी पार पडत आहे. या ब्रिक्स परिषदेसाठी अनेक देशांचे प्रमुख सहभागी झाले आहेत. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन, चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग, इराणचे अध्यक्ष पेझेश्कियन यांच्यासह आदी देशांचे प्रमुख या ब्रिक्स परिषदेत सहभागी झाले आहेत. या ब्रिक्स परिषदेच्या बैठकीला पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते आज औपचारिक सुरुवात झाली.**



यावेळी बोलताना पंतप्रधान मोदी यांनी मोठं भाष्य केलं आहे. 'संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील सुधारणांना आता आणखी विलंब करता येणार नाही', असं वक्तव्य पंतप्रधान मोदी यांनी केलं. तसेच 'आम्ही (ब्रिक्स) कोणाच्याही विरोधात नाही', असं म्हणत पंतप्रधान मोदी यांनी ब्रिक्स परिषदेतून पाश्चात्य देशांना महत्त्वाचा संदेश दिला आहे.

"भारताच्या 'ब्रिक्स' अध्यक्षपदाचा कार्यकाळ यशस्वी करण्यासाठी तुम्ही सर्वांनी दिलेल्या योगदानाबद्दल आणि समर्थनाबद्दल मी मनःपूर्वक आभार मानतो. या वर्षीची ब्रिक्स शिखर परिषद एका ऐतिहासिक टप्प्याचं प्रतीक आहे. आपण ब्रिक्सच्या २० व्या वर्धापनाच्या दिशेने जात आहोत. मानवी जीवनात वयाची २० वर्षे हा परिपक्वता आणि जबाबदारीच्या एका नवीन टप्प्याचा प्रारंभ असतो", असं मोदींनी म्हटलं आहे.

"गेल्या दोन दशकांत 'ब्रिक्स'ने जागतिक स्तरावर आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. आम्ही एकमेकांच्या दृष्टिकोनाचा आदर करतो आणि सर्वसंमतीने पुढे जातो. कोणालाही विरोध करून नाही तर, सर्वांना सोबत घेऊन प्रगती करण्याचा आम्ही प्रयत्न करतो. आता ब्रिक्समधील आपली एकता आणि सर्वसंमतीचे रूपांतर जागतिक स्तरावर ठोस परिणामात करण्याची वेळ आली आहे", असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले आहेत.

संयुक्त राष्ट्रांच्या सनदेवर आधारित आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन करण्याचे आवाहन करतानाच आफ्रिका, आशिया आणि लॅटिन अमेरिकेतील विकसनशील देशांना जागतिक मंचांवर अधिक प्रतिनिधित्व मिळायला हवे, अशी भूमिका या परिषदेत मांडण्यात आली.

काही देशांकडून लादल्या जाणाऱ्या एकतर्फी आर्थिक आणि दुय्यम निर्बंधांवर जाहीरनाम्यात थेट ताशेरे ओढण्यात आले. असे निर्बंध आंतरराष्ट्रीय कायद्यांनुसार बेकायदेशीर असून त्यामुळे गरीब व विकसनशील देशांचा विकास, अन्नसुरक्षा, आरोग्य व्यवस्था आणि मानवी हक्कांवर विपरीत परिणाम होतो, असे रोखठोक मत व्यक्त करण्यात आले. तसेच एकतर्फी आयात शुल्क (टॅरिफ) आणि बिगर-जकात अडथळ्यांमुळे जागतिक व्यापार आणि पुरवठा साखळी विस्कळीत होत असल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली.

## विदेशी पाहुण्यांसाठी अस्सल भारतीय शाकाहारी मेजवानी

ब्रिक्स परिषदेच्या (BRICS SUMMIT) पहिल्याच दिवशी भारताच्या समृद्ध खाद्यसंस्कृतीची आणि विविधतेची झलक पाहायला मिळाली. परिषदेसाठी उपस्थित असलेल्या जागतिक नेत्यांना आणि परदेशी प्रतिनिधींना संपूर्ण शाकाहारी (ALL-VEGETARIAN) भोजनाचा आस्वाद दिला जात आहे. यामध्ये भारताच्या विविध प्रांतांतील खास पारंपरिक पदार्थांसोबतच आंतरराष्ट्रीय शाकाहारी पदार्थांचाही समावेश करण्यात आला आहे. परदेशी व्हीव्हीआयपी पाहुण्यांना भारताच्या विविध भागांतील पाककला आणि परंपरांची ओळख व्हावी, या उद्देशाने हा विशेष मेनू तयार करण्यात आला आहे. यामध्ये उत्तर भारतापासून ते इतर प्रांतांतील प्रसिद्ध पदार्थांचा समावेश आहे.

## हातात हात अन् चेहऱ्यावर हास्य

'ब्रिक्स' शिखर परिषदेमधील पंतप्रधान नरेंद्र मोदी, व्लादिमीर पुतीन आणि शी जिनपिंग यांच्या या खास फोटोची चर्चा होत आहे. हा फोटो सोशल मीडियावर देखील मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. हा फोटो ब्रिक्स शिखर परिषदेदरम्यानचा आहे. या फोटोत पंतप्रधान मोदी हे रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या मध्ये उभे असल्याचं दिसत आहेत. यावेळी पंतप्रधान मोदी हे व्लादिमीर पुतिन आणि शी जिनपिंग यांच्याशी हस्तांदोलन करताना दिसत आहेत. या फोटोत तिनही नेत्यांच्या चेहऱ्यावर स्मित हास्य दिसत आहे. मोदी, पुतिन आणि जिनपिंग यांच्या या खास फोटोमधून काही संदेश देण्याचा प्रयत्न आहे का? याची देखील चर्चा होत आहे.



# श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्टकडून यंदा ‘प्रेम मंदिरा’ची प्रतिकृती

## वृंदावनच्या प्रेम मंदिराची भव्य प्रतिकृती ठरणार यंदाच्या दगडूशेठ गणेशोत्सवाचे खास आकर्षण

**महाईन्यूज । पुणे**

**गणेशोत्सवात श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या वतीने वृंदावनमधील प्रेम मंदिराची प्रतिकृती साकारण्यात येणार आहे. सोमवारी (१४ सप्टेंबर) सकाळी ११ वाजून ११ मिनिटांनी उत्तर प्रदेश येथील श्री राधावल्लभ मंदिराचे तिलकायत अधिकारी श्रीहित मोहितमराल गोस्वामी महाराज यांच्या हस्ते श्रींची प्राणप्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. तर, याच दिवशी सायंकाळी सात वाजता राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते मंदिरावरील विद्युत रोषणाईचे उद्घाटन होणार आहे.**






ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, सरचिटणीस-आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सवप्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण या वेळी उपस्थित होते. कलादिग्दर्शक नीतेश कुमार आणि ग्लिटरी इव्हेंट्स या कंपनीने मंदिराची प्रतिकृती साकारली आहे. प्राणप्रतिष्ठापनेपूर्वी, सोमवारी सकाळी साडेआठ वाजता मुख्य मंदिरापासून आकर्षक फुलांनी सजविलेल्या मयूर रथातून गणरायाची आगमन मिरवणूक काढण्यात येणार आहे. प्रतिष्ठापनेनंतर दुपारी १२ वाजेपासून श्रीमंत दगडूशेठ गणपतीचे दर्शन घेता येणार असल्याचे सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले, ‘भक्ती प्रेम बनते आणि प्रेम देवत्व बनते, या संकल्पनेवर आधारित ही भव्य प्रतिकृती साकारण्यात आली आहे. या प्रतिकृतीचा आकार १२० फूट लांब, ९० फूट रुंद आणि १०० फूट उंच आहे. संगमरवरी वास्तुकलेपासून प्रेरित भव्य दर्शनी भाग, उत्तर भारतीय मंदिराच्या पारंपरिक रचनेचे प्रतिबिंब दर्शवणारी कलाकुसर केलेले स्तंभ आणि घुमट, कृष्णलीला दर्शविणारे शिल्पपट आणि मंदिरावर दर्शनी भागात राधा-कृष्णाची भव्य मूर्ती साकारण्यात आली आहे. स्वागतासाठी बुधवार चौकामध्ये भव्य कमान, तर दोन्ही बाजूंच्या मांडवावर कृष्णलीलेतील विविध प्रसंग साकारण्यात आले आहेत. संपूर्ण परिसरात १५० कॅमेऱ्यांद्वारे नजर ठेवण्यात येणार आहे. तसेच, पोलीस यंत्रणेबरोबर ट्रस्टचे २५० सुरक्षाव्यवस्था बंदोबस्तासाठी तैनात असतील.

### गणेश भक्तांसाठी ५० कोटींचा विमा

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका आणि कटत बोर्ड हद्दीतील गणेश भक्तांसाठी ५० कोटी रुपयांचा विमा काढण्यात आला आहे. त्यात चेंगराचेंगरी, दहशतवादी हल्ला किंवा हवाई हल्ला झाल्यास विम्याचे सुरक्षाकवच मिळणार आहे. अपघाती मृत्यूस प्रति व्यक्ती ५ लाख रुपये, अपंगत्व आल्यास २ लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपयांपर्यंत औषधांचा खर्च देण्यात येणार आहे.

# मेट्रो-‘एचसीएमटीआर’ मार्गिकांचा आठ ठिकाणी छेद! मोठा निर्णय

**महाईन्यूज । पुणे**






**शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रस्तावित ‘एचसीएमटीआर’ उन्नत मार्गिका आणि शहरात नियोजित मेट्रो मार्गिका काही ठिकाणी एकमेकांना छेदत आहे. त्यामुळे दोन्ही प्रकल्पांचे एकत्रित नियोजन करण्यासाठी महापालिका आणि महा मेट्रोच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक झाली.**

सिंहगड रस्त्यावरील हिंगणे ते स्वारगेटदरम्यान सुमारे अडीच ते तीन किलोमीटरचा मार्ग दोन्ही प्रकल्पांसाठी समान असल्याने या भागातील कामांचे नियोजन करणे महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे ही बैठक घेण्यात आली.

शहरातील रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘एचसीएमटीआर’ प्रकल्पाला गती देण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार गेल्या तीन ते चार महिन्यांपासून वेगवेगळ्या पातळ्यांबर बैठका होत आहेत. ‘एचसीएमटीआर’ प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) पुढील तीन महिन्यांत तयार करण्याचे नियोजन महापालिकेने केले असून, त्यासाठी सल्लागार नियुक्त करण्याची प्रक्रिया सध्या अंतिम टप्प्यात आहे.

खडकवासला ते स्वारगेट आणि पुढे सोलापूर रस्त्याने मुंढवा या मेट्रो मार्गाच्या कामावर ‘महामेट्रो’ने लक्ष केंद्रित केले आहे. या मेट्रो मार्गिका आणि ‘एचसीएमटीआर’ मार्गिका शहरात आठ ठिकाणी एकमेकांना छेदत आहेत. सिंहगड रस्त्यावरील हिंगणे ते स्वारगेट या दरम्यान दोन्ही मार्गिका एकाच रस्त्यावरून जाणार आहेत. त्यामुळे या दोन्ही प्रकल्पांच्या बांधकामाचे नियोजन सुरुवातीपासूनच समन्वयाने करणे आवश्यक आहे. यासाठी महापालिकेत महामेट्रो आणि पालिकेतील अधिकाऱ्यांची बैठक झाली.

या बैठकीला महापालिका आयुक्त नवल किशोर राम, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, दोन्ही संस्थांचे वरिष्ठ अधिकारी यांच्यासह महापौर मंजूषा नागपुरे, सिंहगड रस्त्याचे प्रतिनिधित्व करणारे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे गटनेते काका चव्हाण उपस्थित होते.

या बैठकीत ज्या ठिकाणी दोन्ही मार्ग एकमेकांना छेदत आहेत. तेथे दुमजली पुलाचे नियोजन करण्याबाबत चर्चा झाली. काही ठिकाणी मेट्रोचा पूल उंचावर, तर त्याखालून ‘एचसीएमटीआर’चा पूल अशी रचना करण्याची शक्यता तपासण्यात येणार आहे. तसेच, मेट्रो प्रकल्पासाठी आवश्यक असणारी जागा, दोन्ही प्रकल्पांच्या मार्गिका आणि प्रत्यक्ष बांधकामादरम्यान निर्माण होणाऱ्या अडचणी यावरही देखील या बैठकीत चर्चा करण्यात आली. पुणे शहराचा वाढता विस्तार आणि वाहनांची वाढणारी संख्या लक्षात घेता वाहतुकीची नियोजन करणे आवश्यक आहे. यासाठी गेल्या काही महिन्यांपासून नक्की काय उपाय योजना करता येतील यावर वेगवेगळ्या माध्यमातून काम केले जात आहे. सध्या शहरातील अनेक भागांमध्ये वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना तासनतास वाहतूक कोंडीत अडकून बसावे लागत आहे.

# ५७ हजार विद्यार्थ्यांच्या पोषण आहाराला बळ

## महापौर रवि लांडगे यांच्या नेतृत्वाखाली सुमारे ३०० शाळांतील विद्यार्थ्यांना मिळणार स्वच्छ व पौष्टिक आहार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**विद्यार्थ्यांचे आरोग्य, पोषण आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांना केंद्रस्थानी ठेवून पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि अन्नामृत फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नूतनीकरण व आधुनिकीकरण करण्यात आलेल्या शालेय पोषण आहाराच्या केंद्रीय स्वयंपाकगृहाचे आज उद्घाटन करण्यात आले. या अद्ययावत सुविधेमुळे महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे ३०० शाळांमधील तब्बल ५७ हजार विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारी शालेय पोषण आहार व्यवस्था अधिक सक्षम होणार आहे.**



अन्नामृत फाउंडेशनच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना नियमितपणे शालेय पोषण आहार पुरविण्यात येतो. विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या आहाराची गुणवत्ता, स्वच्छता, सुरक्षितता आणि पोषणमूल्ये यांचा विचार करून केंद्रीय स्वयंपाकगृह आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अद्ययावत करण्यात आले आहे. आहार तयार करण्यापासून ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये स्वच्छता व अन्नसुरक्षेच्या निकषांचे काटेकोर पालन करण्यावर भर देण्यात आला आहे.

यावेळी महापौर रवि लांडगे म्हणाले, "विद्यार्थ्यांचे आरोग्य, पोषण आणि शिक्षण यांचा परस्परांशी अतिशय जवळचा संबंध आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच स्वच्छ, सकस आणि पौष्टिक आहार मिळणे हीदेखील आपली महत्त्वाची जबाबदारी आहे. पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ५७ हजार विद्यार्थ्यांना नियमितपणे पोषण आहार उपलब्ध करून दिला जात असून, या व्यवस्थेमध्ये स्वच्छता, सुरक्षितता आणि गुणवत्तेचा उच्च दर्जा कायम राखणे आवश्यक आहे. आधुनिक पद्धतीने अद्ययावत करण्यात आलेले हे केंद्रीय स्वयंपाकगृह त्यादृष्टीने निश्चितच महत्त्वपूर्ण ठरेल."

महापौर लांडगे पुढे म्हणाले, "विद्यार्थ्यांना मिळणारा प्रत्येक घास हा सुरक्षित, पौष्टिक आणि गुणवत्तापूर्ण असावा, ही महानगरपालिकेची भूमिका आहे. विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासासाठी योग्य पोषण अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे भविष्यातही विद्यार्थीकेंद्री उपक्रमांना प्राधान्य देत महानगरपालिकेच्या माध्यमातून शैक्षणिक व पोषणविषयक सुविधा अधिक सक्षम करण्यावर भर दिला जाईल."

शालेय पोषण आहार हा विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या गरजू कुटुंबांतील विद्यार्थ्यांना आवश्यक पोषण मिळण्यामध्ये या योजनेची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यामुळे केवळ आहाराचे वितरण न करता त्याची गुणवत्ता, स्वच्छता, सुरक्षितता आणि पौष्टिकता सातत्याने सुनिश्चित करणे आवश्यक आहे. याच उद्देशातून केंद्रीय स्वयंपाकगृहाचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे. या उद्घाटन समारंभास महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, इस्कॉनचे आध्यात्मिक गुरु गौरांग प्रभू, आमदार श्रीकांत भारतीय, आमदार अमित गोरखे, भाजपा प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, नगरसेविका सारिका मासुळकर यांच्यासह अन्नामृत फाउंडेशनचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

अद्ययावत केंद्रीय स्वयंपाकगृहामुळे मोठ्या प्रमाणावर पोषण आहार तयार करण्याची क्षमता, स्वच्छता व अन्नसुरक्षेचे व्यवस्थापन तसेच विद्यार्थ्यांपर्यंत वेळेत गुणवत्तापूर्ण आहार पोहोचविण्याची प्रक्रिया अधिक सक्षम होणार आहे. परिणामी, पिंपरी-चिंचवडमधील हजारो विद्यार्थ्यांच्या आरोग्यपूर्ण व उज्ज्वल भविष्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना या सुविधेमुळे आणखी बळ मिळणार आहे.

### आमदार श्रीकांत भारतीय यांचे विशेष सहकार्य

या अद्ययावत केंद्रीय स्वयंपाकगृहासाठी आवश्यक जागा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक तथा आमदार श्रीकांत भारतीय यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहारासाठी आधुनिक व अधिक सक्षम व्यवस्था उभारण्यास मदत झाली. महानगरपालिका आणि अन्नामृत फाउंडेशन यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांना दर्जेदार पोषण आहार उपलब्ध करून देण्याचे काम यापुढेही अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

# शहरातील अनधिकृत अतिक्रमणांवर महापालिकेची धडक कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांविरोधात महानगर पालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर आणि अतिक्रमण मुख्य कार्यालय उप आयुक्त अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका प्रशासनाच्या वतीने शहरातील सर्व १० क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात राबविण्यात आलेल्या या कारवाईत एकत्रितपणे सुमारे ८३ हजार ९९ चौरस फूट क्षेत्रावरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली.**




> पिंपरी-चिंचवड शहरातील सार्वजनिक जागा, रस्ते व पदपथ अतिक्रमणमुक्त ठेवणे तसेच अनधिकृत बांधकामांना प्रतिबंध करणे ही महापालिका प्रशासनाची सातत्यपूर्ण जबाबदारी आहे. नागरिकांनी अनधिकृत बांधकामे अथवा अतिक्रमणे करू नयेत. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. शहराचे नियोजनबद्ध व शिस्तबद्ध स्वरूप कायम ठेवण्यासाठी यापुढेही क्षेत्रनिहाय नियमित कारवाई सुरू राहणार आहे.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

महापालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांना प्रतिबंध करण्यासाठी प्रशासनाकडून सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. यामध्ये आर.सी.सी. स्वरूपाची अनधिकृत बांधकामे, अनधिकृत पत्राशेड, नव्याने सुरू असलेली बांधकामे तसेच पदपथावरील अनधिकृत टपऱ्या, हातगाडे आणि इतर अतिक्रमणांचा समावेश आहे.

अ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील साईनगर, निगडी परिसरात अंदाजे ३ हजार ४९८ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली. ब क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील शगुन चौक, पिंपरी मार्केट, एम्पायर ब्रिजखाली चिंचवड आणि वाल्हेकरवाडी परिसरात १० हजार ५३८ चौरस फूट क्षेत्रावरील अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली. क क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत चिखली, कुदळवाडी, शिवरोड, रवी रंजन वजन काटा चिखली आणि डी-मार्ट शेजारी चिंचवड परिसरात १२ हजार ७२३ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली. ड क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात ५ हजार ४०० चौरस फूट, तर ई क्षेत्रीय कार्यालयाच्या भोसरी व मोशी परिसरात ७ हजार ९६५ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली. फ क्षेत्रीय कार्यालयाच्या मोरे वस्ती, चिखली, तळवडे आणि नेवाळे वस्ती परिसरात सर्वाधिक १९ हजार ४०० चौरस फूट क्षेत्रावरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली.

ग क्षेत्रीय कार्यालयाच्या राजवाडे नगर, गोकुळवाडी, पवनानगर, स्वप्ननगरी कॉलनी, काळेवाडी, डोंगरे कॉर्नर, मंगल नगर आणि थेरगाव परिसरात १३ हजार ३५ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली. ह क्षेत्रीय कार्यालयाच्या जुनी सांगवी परिसरात १ हजार ८६ चौरस फूट, ज क्षेत्रीय कार्यालयाच्या वाल्हेकरवाडी, दत्त मंदिर रोड वाकड, पिंपळे निलख व किवळे परिसरात ६ हजार २८ चौरस फूट, तर ल क्षेत्रीय कार्यालयाच्या भोसरी, इंद्रायणी नगर, संत तुकाराम नगर आणि पिंपरी परिसरात ३ हजार ४२६ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली. सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली झालेल्या या कारवाईत उपअभियंते, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, बीट निरीक्षक, २१८ एम.एस.एफ. जवान, पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच महापालिका मजूर यांनी सहभाग घेतला.



## भूमिका

**जागतिक राजकारणाच्या पटावर सध्या जुन्या व्यवस्था डळमळीत होत असताना नव्या जागतिक व्यवस्थेचे चित्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. अमेरिकेचे आर्थिक व सामरिक वर्चस्व कायम असले, तरी त्याला पूर्वीसारखी निर्विवाद मान्यता राहिलेली नाही. चीनने आर्थिक सामर्थ्याच्या जोरावर स्वतंत्र प्रभावक्षेत्र निर्माण केले आहे.**

# ‘ब्रिक्स’मधून भारताचा विश्वविस्तार




रशिया निर्बंधांना तोंड देत आपली राजकीय जागा टिकवण्याचा प्रयत्न करीत आहे. या पार्श्वभूमीवर भारताने आर्थिक विकासाचा वेग कायम ठेवत जागतिक स्तरावरील आपले स्थान अधिक भक्कम केले आहे. पश्चिम आशियातील संघर्ष, अस्थिर ऊर्जा व व्यापारमार्ग, वाढता संरक्षणवाद आणि बहुपक्षीय संस्थांच्या परिणामकारकतेवरील प्रश्न या साऱ्या पार्श्वभूमीवर दिल्लीतील ‘ब्रिक्स’ शिखर परिषदेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

ब्राझील, रशिया, भारत आणि चीन या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांसाठी वापरला गेलेला ‘ब्रिक’ हा शब्द पुढे प्रभावी राजनैतिक व्यासपीठात परिवर्तित झाला. दक्षिण आफ्रिकेच्या प्रवेशानंतर ‘ब्रिक्स’ आणि त्यानंतर इजिप्त, इथिओपिया, इराण, यूएई व इंडोनेशियाच्या सहभागामुळे त्याची व्याप्ती अधिक वाढली. आज जागतिक लोकसंख्येच्या जवळपास निम्म्या लोकसंख्येचे आणि जागतिक जीडीपीच्या ४० टक्क्यांहून अधिक वाट्याचे प्रतिनिधित्व करणारा हा प्रभावशाली समूह ठरला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या परिषदेत ‘लवचिकता, नवोपक्रम, सहकार्य आणि सातत्य’ या चार प्रमुख मूल्यांवर भर देण्यात आला आहे. ‘मानवता प्रथम’ या दृष्टिकोनातून भारत ब्रिक्सला केवळ पश्चिमी जगाला आव्हान देणारा गट न बनवता जागतिक व्यवस्थेतील असमतोल दूर करणारे व्यासपीठ बनवण्याचा प्रयत्न करीत आहे. स्थानिक चलनांमध्ये व्यापार, पुरवठा साखळी मजबूत करणे, न्यू डेव्हलपमेंट बँकेचा विस्तार, हरित ऊर्जा व पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक आणि यूपीआयच्या माध्यमातून आर्थिक समावेशन हे भारताचे महत्त्वाचे प्राधान्यक्रम आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेचा सुरक्षित, नैतिक आणि जबाबदार वापर हाही भविष्यासाठी महत्त्वाचा विषय आहे.

मात्र, भारताच्या अध्यक्षतेसमोर आव्हाने कमी नाहीत. ब्रिक्समध्ये परस्परविरोधी हितसंबंध असलेले देश आहेत. इराण, सौदी अरेबिया आणि यूएई यांच्यातील संवेदनशील संबंध, पश्चिम आशियातील वाढता संघर्ष आणि मागील मंत्रिस्तरीय बैठकीतील मतभेद यामुळे सामूहिक सहमती साधणे सोपे नाही. अशा परिस्थितीत सर्व सदस्यांना एका समान भूमिकेवर आणण्याचे भारताचे राजनैतिक कौशल्य कसोटीला लागणार आहे.

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासह अनेक जागतिक नेत्यांची उपस्थिती या परिषदेला अधिक महत्त्वपूर्ण बनवते. विशेषतः भारत-चीन संबंधांच्या पार्श्वभूमीवर मोदी-जिनपिंग यांच्यातील द्विपक्षीय चर्चा लक्षवेधी ठरणार आहे. ब्रिक्समधील भारत, चीन आणि रशिया या प्रमुख शक्तींमधील समन्वय संघटनेच्या भविष्यासाठी निर्णायक ठरेल.

## प्रासंगिक »

# कष्टाचे बीज

**एका गावात गणू नावाचा गरीब शेतकरी राहत होता. त्याच्याकडे थोडीशी जमीन होती. एक वर्ष पाऊस कमी झाला. गावातील अनेक शेतकऱ्यांनी निराश होऊन शेतीकडे पाठ फिरवली. पण गणूने हार मानली नाही.**

त्याने विहिरीतून पाणी आणून शेतातील रोपांची काळजी घेतली. त्याचा मित्र रघू त्याला म्हणाला, “इतके कष्ट करूनही पीक आले नाही तर काय करशील?”

गणू हसून म्हणाला, “प्रयत्न वाया जात नाहीत. आजचे कष्ट उद्याची आशा निर्माण करतात.” काही दिवसांनी अचानक मुसळधार पाऊस झाला. गणूच्या शेतातील रोपे जोमाने वाढली. काही महिन्यांत त्याच्या शेतात भरघोस पीक आले. मात्र, रघूच्या शेतात काहीच उरले नव्हते. रघूला आपली चूक समजली.

त्याने गणूकडे जाऊन विचारले, “तुला एवढा विश्वास कुठून मिळाला?” गणू म्हणाला, “नशिबाची वाट पाहणारा माणूस संधी गमावतो; पण प्रयत्न करणारा माणूस संधी निर्माण करतो.” त्या दिवसापासून रघूनेही मेहनत करण्याचा निर्धार केला.

- तात्पर्य : सतत प्रयत्न केल्यास संकटावर मात करून यश मिळते.

धर्म हा माणसाच्या जन्मासोबत मिळणारा परिचय असला, तरी माणूस म्हणून त्याची खरी ओळख कोणती, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. समाजात प्रत्येक धर्माभोवती काही रूढ चौकटी, धारणा, आपपरभाव आणि शंका निर्माण झालेल्या आहेत.

# धर्मरेषेपलीकडचं माणूसपण



संवादाचा अभाव आणि गैरसमजांची वाढ यामुळे या शंका भयात रूपांतरित होतात आणि त्यातून धर्माधर्मातील तेढ, द्वेष आणि संघर्षाला खतपाणी मिळते. ‘ऑनर किलिंग’सारख्या अमानुष घटनांनाही अनेकदा धर्म आणि जातींच्या चौकटीतून पाहिले जाते. अशा वातावरणात आंतरधर्मीय विवाहांकडे पाहण्याची दृष्टी अधिक व्यापक होण्याची गरज आहे.

भिन्न धर्मातील दोन व्यक्ती विवाहबद्ध झाल्या की तो दोन धर्मांमधील संघर्ष ठरतो, ही प्रतिमा वास्तवापेक्षा अधिक गडद आहे. माध्यमांनी आणि समाजाने अशा नात्यांकडे अनेकदा कुतूहल, संशय आणि पूर्वग्रहाच्या नजरेने पाहिले. मात्र, समान धर्मातील विवाहांमध्येही दोन कुटुंबांच्या परंपरा, जीवनशैली, विचार आणि अपेक्षा वेगवेगळ्या असतात. मग धर्म वेगळा असला कीच संघर्ष अपरिहार्य का मानायचा?

खरं तर कोणतंही नातं टिकवण्यासाठी धर्मापेक्षा संवाद, समजूतदारपणा आणि क्षमा मागण्याची तयारी अधिक महत्त्वाची ठरते. अबोला दुरावा वाढवतो, तर संवाद नात्याला जोडून ठेवतो. ‘समोरच्याने आपोआप समजून घ्यावे’ ही अपेक्षा अनेकदा नात्यात ताण निर्माण करते. स्वतःच्या मनाचा थांग लागत नसताना जोडीदाराने प्रत्येक भावना ओळखावी, ही अपेक्षा अवास्तवच म्हणावी लागेल.

या सगळ्यापेक्षा मोठे आव्हान मात्र धर्म नसून पितृसत्ताक मानसिकता आहे. आपल्या समाजातील अनेक विषमतेच्या मुळाशी पुरुषसत्ताक व्यवस्था आहे. धर्माच्या रचनेपासून सामाजिक व्यवहारापर्यंत स्त्रीला दुय्यम स्थान देणाऱ्या अनेक परंपरा आजही टिकून आहेत. धर्मग्रंथ समानतेचा संदेश देत असले, तरी प्रत्यक्ष जीवनात समानता दिसतेच असे नाही. त्यामुळे धर्माच्या नावापेक्षा माणसाच्या अधिकारांना आणि स्त्री-पुरुष समानतेला महत्त्व देणारी सामाजिक मानसिकता विकसित होणे गरजेचे आहे. धर्माकडे पाहण्याची पद्धतही बदलावी लागेल. धर्म जन्माने मिळतो; पण धार्मिकता कशी जगायची, हा प्रत्येकाचा वैयक्तिक शोध असायला हवा. धर्म माणुसकी, संवेदनशीलता आणि सहृदयता शिकवतो की कट्टरता आणि द्वेष, याचा आत्मपरीक्षणाने विचार व्हायला हवा. माणसांवर प्रेम करणारा धर्मच खऱ्या अर्थाने धर्म ठरतो. माणसांपेक्षा धर्म मोठा मानला की धार्मिकतेचे रूपांतर कट्टरतेत होते.

## ।। अभंगवाणी ।।



दानें कांपे हात ।
नाव तेविशीं मात ॥१॥

कथी चावटीचे बोल ।
हिंग क्षीरीं मिथ्या फोल ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कोकणात गणेशोत्सवासाठी चाकरमान्यांचा महापूर

## मुंबई-गोवा महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी, पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा

**महाईन्यूज । रत्नागिरी**

**गणरायाच्या आगमनाची चाहूल लागताच मुंबई, पुण्यासह राज्याच्या विविध भागांतून कोकणाकडे परतीचा प्रवास करणाऱ्या गणेशभक्तांची संख्या झपाट्याने वाढली आहे. गणेशोत्सवाच्या उत्साहाने कोकणाकडे निघालेल्या वाहनांनी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग अक्षरशः गजबजून गेला असून, दिवस-रात्र वाहनांची प्रचंड वर्दळ सुरू आहे. या वाढत्या वाहतूक कोंडीचा थेट फटका महामार्गालगतच्या पेट्रोल पंपांनाही बसत असून, पेट्रोल, डिझेल आणि सीएनजी भरण्यासाठी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत.**



गणेशोत्सवासाठी गावाकडे परतणाऱ्या गणेशभक्तांचा लोंढा आता कोकणच्या दिशेने वेगाने सरकत आहे. मुंबई-पुणे पट्ट्यातून हजारो वाहने कोकणाकडे मार्गस्थ झाल्याने मुंबई-गोवा महामार्गावर चारचाकी, दुचाकी आणि खासगी प्रवासी वाहनांची अक्षरशः गर्दी उसळली आहे. अनेक ठिकाणी वाहनांची सततची ये-जा सुरू असल्याने महामार्गावर वाहतुकीचा ताण स्पष्टपणे जाणवत आहे.

गावाकडे जाण्याच्या घाईत प्रवासादरम्यान इंधन भरण्यासाठी वाहनचालक मोठ्या संख्येने पेट्रोल पंपांवर थांबत आहेत. त्यामुळे अनेक पंपांच्या प्रवेशद्वारापासूनच वाहनांच्या रांगा लागल्याचे चित्र दिसत आहे. पेट्रोल-डिझेलसोबत सीएनजी वाहनांची संख्याही वाढल्याने काही ठिकाणी इंधन भरण्यासाठी वाहनचालकांना प्रतीक्षेत राहावे लागत आहे.

सामान्य दिवसांच्या तुलनेत गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर इंधनासाठी येणाऱ्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांवरही कामाचा प्रचंड ताण आला आहे. वाहनांची अखंड आवक, इंधन भरण्याची प्रक्रिया आणि वाढती ग्राहकसंख्या यामुळे कर्मचाऱ्यांची मोठी धावपळ सुरू आहे.

गणेशोत्सवाच्या काळात कोकणात येणाऱ्या लाखो गणेशभक्तांचा प्रवास सुरक्षित, सुरळीत आणि विनाअडथळा व्हावा, यासाठी वाहतूक आणि संबंधित यंत्रणांना अधिक सतर्क राहावे लागणार आहे. गणरायाच्या स्वागतासाठी कोकण सज्ज होत असतानाच महामार्गावर वाहनांचा महापूर आणि इंधनासाठी लागलेल्या रांगा हे यंदाच्या गणेशोत्सवाच्या वाढत्या गर्दीचे जिवंत चित्र ठरत आहे.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी आम्ही सह कुटुंब गावी कोकणात गणेशोत्सवासाठी आलो आहोत. मुंबई गोवा महामार्ग ब-यापेकी झाल्याने आम्हाला काही प्रमाणात त्रास कमी झाला. मात्र वाहतूक कोंडी कायम आहे. व इंधन तूट आज ही जाणवत आहे.

### पुढील काही दिवसांत गर्दी आणखी वाढणार

गणेशोत्सव जवळ येत असल्याने पुढील काही दिवसांत चाकरमान्यांचा ओघ आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक नियंत्रणासोबतच पेट्रोल पंपांवरील वाढत्या गर्दीचे नियोजन करणेही प्रशासनासमोर मोठे आव्हान ठरणार आहे. पेट्रोल पंपांवरील वाहनांच्या रांगा महामार्गावर येऊन वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे.

# ‘लाडक्या बहिणींनी लताताई, अमृताताईंना हळद-कुंकू देऊन आरक्षण मागावं’

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्याच्या राजकारणात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. यातच सध्या मराठा आरक्षण अंमलबजावणीच्या विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे यांनी मागील १४ दिवसांपासून अंतरवाली सराटीत उपोषण सुरू केलं होतं. मात्र, त्यांच्या मागण्यांबाबत अद्यापही राज्य सरकारने कोणताही ठोस तोडगा काढलेला नाही. त्यामुळे आता मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षण अंमलबजावणीच्या विविध मागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्याची घोषणा केली आहे.**



आज १२ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता अंतरवाली सराटीत मराठा समाजाची एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या आंदोलनाची पुढील दिशा स्पष्ट करत मुंबईत आंदोलन करण्याची अधिकृत घोषणा अंतरवाली सराटीत बोलताना केली आहे. यावेळी मनोज जरांगे यांनी महिलांना एक महत्वाचं आवाहन केलं आहे.

“लताताई (उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पत्नी) आणि अमृताताई (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी) यांच्या घरी जाऊन महिलांनी हळदी-कुंकवाचा कार्यक्रम करावा”, असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं आहे. दरम्यान, लाडक्या बहिणींनी लताताई आणि अमृताताईंना हळद-कुंकू देऊन आरक्षण मागावं, असंही आवाहन मनोज जरांगे यांनी महिलांना आवाहन केलं आहे.

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून महाराष्ट्रातील राजकीय आणि सामाजिक वातावरण चांगलेच तापले आहे. अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांचे गेल्या १४ दिवसांपासून सुरू असलेल्या बेमुदत उपोषणावर अद्याप कोणताही तोडगा निघालेला नाही. या पार्श्वभूमीवर आज, १२ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता समर्थकांची एक महत्त्वाची बैठक सुरु आहे. या बैठकीत जरांगे पाटील यांनी आपल्या आंदोलनाची पुढील दिशा स्पष्ट करत मुंबईत धडक देण्याची अधिकृत घोषणा केली आहे.

जालना येथील अंतरवाली सराटीमधून सुरू होणाऱ्या या मोर्चाचा पहिला मुक्काम पाटोदा या ठिकाणी असणार आहे. त्यानंतर श्रीगोंदा येथे दुसरा मुक्काम असणार आहे. त्यानंतर हडपसर (पुणे) या ठिकाणी तिसरा मुक्काम असणार आहे. त्यानंतर खोपोली येथे मुक्काम करत पाचव्या दिवशी मुंबईच्या आझाद मैदानात शांततापूर्ण मार्गाने हा मोर्चा धडकणार असल्याची माहिती जरांगे पाटील यांनी दिली आहे.

### मनोज जरांगे काय म्हणाले?

“आम्ही जात आहोत मुंबईतील आझाद मैदानावर आणि आमची माय-माऊली, लाडक्या बहिणी जातील अमृता फडणवीस, लता शिंदे यांच्या घरी. तेथे जाऊन मराठा महिलांनी लताताई आणि अमृताताईंना हळद-कुंकू देऊन आरक्षण मागावं. आता त्यांची अडचण अशी होईल की एक जणाची लाडकी बहीण आणि एक जणाची लाडकी दीदी. त्यामुळे तुमच्यासाठी त्यांना त्या ठिकाणी मंडप टाकणं भाग आहे. त्यामुळे महिलांनी लता शिंदे यांच्या घरी आणि अमृता फडणवीस यांच्या घरी जाऊन हळदी-कुंकवाचा कार्यक्रम करा. मात्र, कोणत्या हळदी-कुंकवाचा? तर मराठा आरक्षणाच्या हळदी-कुंकवाचा. तेथे हळदी-कुंकवाचा कार्यक्रम करत असताना सर्व महिलांनी लता शिंदे आणि अमृता फडणवीस यांना सांगायचं की तेवढं आम्हाला मराठा आरक्षण द्यायला सांगा”, असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं आहे.

# कॅलिफोर्नियात भारतीय वंशाच्या महिलेची हत्या

## वर्षभर पाठलाग करून भरस्त्यातच गोळी झाडली; आरोपीनेही जीवन संपवलं

महाईन्यूज । नवी दिल्ली

**कॅलिफोर्नियातील सॅक्रामेंटो येथे मंगळवारी एका ३८ वर्षीय शालिनी ठाकूर या भारतीय वंशाच्या महिलेचा पाठलाग करून तिची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. गेल्या काही महिन्यांपासून एक २२ वर्षीय तरुण तिचं लैंगिक शोषण आणि मानसिक छळ करत होता. त्यानंतर, पोलिसांनी एका गजबजलेल्या महामार्गावर गाडी अडवल्यानंतर या आरोपीने स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**





सॅक्रामेंटो काउंटी शेरीफ कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, पीडित शालिनी ठाकूर हिला सॅक्रामेंटोच्या आर्डेन आर्केड परिसरातील एका शॉपिंग प्लाझामध्ये तिच्या कामाच्या ठिकाणी सोडण्यात येत होतं, तेव्हा रोहित नावाच्या आरोपीने तिच्याजवळ जाऊन तिला हटकलं. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, रोहित हा एक बेकायदेशीर स्थलांतरित होता. त्याला यापूर्वी ॲरिझोनामध्ये ताब्यातही घेण्यात आलं होतं. शालिनीने तिथून पळून जाण्याचा प्रयत्न केला, परंतु रोहितने तिचा पाठलाग केला आणि भर रस्त्यात तिच्यावर लागोपाठ गोळ्या झाडल्या. ती खाली पडल्यानंतर त्याने अगदी जवळून तिच्या डोक्यात आणखी एक गोळी झाडली. वैद्यकीय पथकाने तिला घटनास्थळीच मृत घोषित केलं.

'केसीआरए चॅनेल ३' च्या फुटेजमध्ये संशयिताची कार शेरीफच्या वाहनांनी आणि एका लढाऊ वाहनाने वेढलेली दिसली, तर पोलीस बंदुका रोखून उभे होते. अखेर पोलिसांनी ड्रायव्हरच्या बाजूची काच फोडली आणि कारजवळ जाण्यापूर्वी आत एक ड्रोन पाठवला. संशयित आरोपी ड्रायव्हरच्या सीटवर रक्ताच्या थारोळ्यात पडला होता, त्याच्या शरीरावर स्वतःवर झाडलेल्या गोळीची जखम दिसत होती.

पोलिसांनी नंतर दुजोरा दिला की रोहितचा त्याच जखमेमुळे मृत्यू झाला. पोलिसांनी कोणताही गोळीबार केला नसल्याचं वृत्त 'केसीआरए'ने दिलं आहे. 'द सॅक्रामेंटो बी' नुसार, न्यायालयीन कागदपत्रांवरून स्पष्ट होतं की, हा छळ सप्टेंबर २०२५ च्या सुमारास सुरू झाला आणि हळूहळू तो अत्यंत गंभीर व धोकादायक बनला. शालिनी तिच्या कामाच्या ठिकाणी डोअरडॅश पिकअपच्या माध्यमातून रोहितला ओळखत होती. रोहित तिच्या घराबाहेर तासन्तास थांबायचा, तिच्या कारचे टायर पंक्चर करायचा आणि तिच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी कारच्या खाली 'Apple AirTag' लावला होता.

या प्रतिबंधात्मक आदेशाच्या कागदपत्रांनुसार, रोहित शालिनीवर लग्नासाठी दबाव टाकत होता आणि तिने कोणाशी बोलावे यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत होता. एका प्रसंगी, त्याने तिच्या फ्लॅटच्या चावीची नक्कल बनवून ती झोपलेली असताना घरात प्रवेश केला होता. शेरीफच्या अधिकाऱ्यांनी रोहितच्या या वर्तनाबद्दल चिंता व्यक्त केली होती आणि ठाकूर यांना प्रतिबंधात्मक आदेश मिळवण्यास सांगितलं होतं.

### संशयिताने स्वतःवर झाडली गोळी

प्रत्यक्षदर्शींनी पोलिसांना संशयिताच्या कारचं वर्णन दिलं होतं, जे सॅक्रामेंटो काउंटी शेरीफ ऑफिसच्या 'ऑटोमेटेड लायसन्स प्लेट रीडर' सिस्टममध्ये टाकण्यात आलं. लेफ्टनंट अमर गांधी यांनी दिलेल्या माहितीनुसार, काही वेळातच त्या वाहनाचे शेवटचं ठिकाण समजलं. काही मिनिटांतच ती कार ईस्टबाउंड हायवे ५० वर आढळून आली. पोलिसांनी गाडी थांबवण्याचा प्रयत्न केला असता, रोहितने अचानक ब्रेक दाबून गाडी हायवेवरच थांबवली. या पोलीस कारवाईमुळे कॅलिफोर्निया हायवे पेट्रोलने ईस्टबाउंड कडील सर्व मार्ग बंद केले.

# बलात्कार प्रकरणातील दोषी प्रज्वल रेवण्णाचे तुरुंगातही विकृत कृत्य

महाईन्यूज । बंगळुरू

**बलात्कार प्रकरणात कारावासात असलेल्या माजी खासदार प्रज्वल रेवण्णाचा आणखी एक प्रताप समोर आला आहे. काही दिवसांपूर्वी रेवण्णा तुरुंगात मोबाइल वापरत असल्याची बाब समोर आली होती. त्यानंतर तो मोबाइल जप्त करण्यात आला. या मोबाइलमध्ये अश्लील व्हिडीओ आढळल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. याबद्दलचे वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिले आहे.**





माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचा नातू आणि जनता दल (धर्मनिरपेक्ष) पक्षाचा माजी खासदार प्रज्वल रेवण्णाचे प्रकरण २०२४ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान चांगलेच गाजले होते. महिलांवर बळजबरी करून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करत व्हिडीओ रेकॉर्ड केल्याचा आरोप रेवण्णावर ठेवण्यात आला होता. याप्रकरणी सध्या तो कारावासात आहे. मात्र कारावासात अवैधरित्या मोबाइल बाळगल्यानंतर त्याची पुन्हा चर्चा होत आहे.

बंगळुरुच्या मध्यवर्ती कारागृहात ११ ऑगस्ट रोजी गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी अचानक धाड टाकली. यावेळी रेवण्णा मोबाइल फोन वापरताना आढळला. रेवण्णाला ज्या बॅरेकमध्ये ठेवण्यात आले होते, तिथे तपास अधिकाऱ्यांना एक चार्जर, पेन ड्राइव्ह आणि एक वही मिळाली. पाच जण बाहेरून वस्तूंची तस्करी करत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर ही धाड टाकली गेली.

या प्रकरणी पोलिसांनी आता पाचही आरोपींना अटक केली आहे. तपासकर्त्यांनी सांगितले की, मोबाइल फोन तुरुंगात आणण्यासाठी रेवण्णाने ७० हजार रुपये दिले. तर सीम कार्ड घेण्यासाठी ३० हजार रुपये दिले.

तुरुंगाचे अधिकारी प्रकाश गावडे यांनी स्वतः मोबाइल फोन रेवण्णाच्या ताब्यात दिला. विचाराधीन कैदी मोहम्मद तौसिफ याने तोंडात लपवून सीम कार्ड आणले आणि ते रेवण्णाला दिले. यानंतर गावडेने रेवण्णाला चार्जर आणि पेन ड्राइव्हही पुरवल्याचा आरोप करण्यात येत आहे. गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, यापूर्वी तुरुंगात गांजाची तस्करी केल्याप्रकरणी गावडेला अटक करून निलंबित करण्यात आले होते. कर्नाटक उच्च न्यायालयाने बलात्कार प्रकरणात रेवण्णाची जन्मठेपेची शिक्षा स्थगित करण्याची आणि अंतरिम जामीन देण्याची याचिका फेटाळली होती. गुन्ह्याचे गांभीर्य आणि लैंगिक शोषणाचे अनेक खटले प्रलंबित असल्याचे नमूद करत न्यायालयाने त्याला दिलासा देण्यास नकार दिला. तसेच तो बाहेर आल्यास साक्षीदारांवर आणि प्रलंबित खटल्यांवर दबाव येऊ शकतो, अशी भीती न्यायालयाने व्यक्त केली. लैंगिक शोषण, अश्लील चित्रीकरण आणि पुरावे नष्ट केल्याप्रकरणी विशेष न्यायालयाने प्रज्वल रेवण्णाला ऑगस्ट २०२५ मध्ये दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.

### मोबाइलमध्ये आढळले अश्लील व्हिडीओ

जप्त केलेला फोन आणि पेन ड्राइव्ह फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठविण्यात आला होता. फोनमध्ये डझनभर पॉर्न व्हिडीओ आणि पेन ड्राइव्हमध्ये वेब सीरीज असल्याचे आता उघड झाले आहे. या प्रकरणामुळे बंगळुरूच्या मध्यवर्ती कारागृहात व्हीआयपी कैद्यांना मिळणाऱ्या विशेष सुविधांवर पुन्हा एकदा टीका होऊ लागली आहे.

# पूजा सावंतचा लाँग डिस्टन्स संसार!

महाराष्ट्राची कलरफुल अभिनेत्री पूजा सावंत फेब्रुवारी २०२४ मध्ये लग्नबंधनात अडकली. पूजाच्या पतीचं नाव सिद्धेश चव्हाण असून तो कामानिमित्त ऑस्ट्रेलियात असतो. लग्नानंतर पूजा ऑस्ट्रेलिया-भारत असा प्रवास करत असते. गेल्या काही महिन्यात सिनेमांचं प्रदर्शन, प्रमोशन यामुळे पूजा भारतातच आहे. आता पूजाचे नवरोबा अनेक महिन्यांनी भारतात आले आहेत आणि हे दोघंही एकत्र फिरायला गेलेत. सिद्धेशबरोबरचा क्युट सेल्फी फोटो शेअर करत पूजाने 'Vacation Mode On' असं कॅप्शन या फोटोंना दिलं आहे.

निसर्गरम्य वातावरणात पूजा सध्या Vacation एन्जॉय करतेय. अभिनेत्रीने शेअर केलेल्या आणखी एका फोटोत निसर्गाच्या सानिध्यात असलेलं सुंदर स्विमिंग पूल आणि तिच्या लक्झरी रूमची झलक पाहायला मिळतेय. पूजाने शेअर केलेले हे गोड फोटो चाहत्यांच्याही पसंतीस उतरले आहेत.

पूजा सावंतचा संसार लाँग डिस्टन्स सुरू आहे. याबद्दल काही दिवसांपूर्वी



दिलेल्या मुलाखतीत ती म्हणाली होती, "माझा संसार टिपिकल असा नाहीये. कारण, अर्थात आमचा संसार लाँग डिस्टन्स सुरू आहे. आम्ही भेटण्यासाठी अशी वेळ वगैरे काहीच ठरवलेलं नसतं की, या-या महिन्यात आपण भेटायचंय. जेव्हा इथे माझं कोणतंच काम सुरू नसतं किंवा काम कमी असतं...तेव्हा मी ऑस्ट्रेलियाला जाऊन माझ्या नवऱ्याला भेटते. त्याच्या प्रोफेशनमध्ये त्याला फार सुट्ट्या मिळत नाहीत. त्यामुळे तो फार प्रवास करू शकत नाही. नशिबाने आपलं प्रोफेशन असं आहे की, एखादी सुट्टी मिळू शकते. याशिवाय दोन प्रोजेक्ट्सच्या शूटिंगमध्ये आपल्याला ब्रेक सुद्धा मिळतो. त्यामुळे माझं ऑस्ट्रेलियाला येणं-जाणं जास्त असतं. आता हळुहळू आम्हाला सगळं जमतंय."

"मी लग्नानंतर संसारासाठी जाणीवपूर्वक वेळ दिला. पण, मला इथल्या सुद्धा सगळ्या गोष्टी बॅलन्स करायच्या होत्या. पहिलं वर्ष माझ्यासाठी आणि सिद्धेशसाठी खूप कठीण होतं. पण, आता आम्ही सगळ्या गोष्टी व्यवस्थित मॅनेज करतोय." असं पूजाने सांगितलं.



## प्राजक्ता माळीच्या गळ्यात मंगळसूत्र

अभिनेत्री प्राजक्ता माळी तिच्या अभिनयासोबतच हटके फॅशन सेन्स आणि दागिन्यांच्या खास कलेक्शनसाठीही लोकप्रिय आहे. तिच्या 'प्राजक्तसाज' या ज्वेलरी ब्रँडमधील नवनवीन दागिने नेहमीच चाहत्यांचं लक्ष वेधून घेतात. नुकतंच प्राजक्ताने आपल्या ब्रँडमधून 'रखुमाई मंगळसूत्र' खास ग्राहकांच्या भेटीला आणलं आणि या मंगळसूत्राला चाहत्यांकडून तुफान प्रतिसाद मिळाला आहे. लॉन्च झाल्यानंतर अवघ्या काही तासांतच 'रखुमाई मंगळसूत्र' सोल्ड आऊट झाल्याची माहिती स्वतः प्राजक्ताने सोशल मीडियाच्या माध्यमातून दिली. नुकत्याच शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये प्राजक्ताने स्वतः हे मंगळसूत्र परिधान करून त्याचा लूक आणि लांबी चाहत्यांना दाखवली आहे. मंगळसूत्र लॉन्च करताना ते प्राजक्ताकडे उपलब्ध नसल्याने ती त्याचा लूक चाहत्यांना दाखवू शकली नव्हती. हे मंगळसूत्र कुठेतरी मिसप्लेस झालं होतं. मात्र, नंतर ते सापडल्यानंतर प्राजक्ताने खास व्हिडीओ शेअर करत चाहत्यांना 'रखुमाई मंगळसूत्रा'ची झलक दाखवली. या व्हिडीओमध्ये प्राजक्ताने सांगितलं की, "परवाच दिवशी आपलं रखुमाई मंगळसूत्र लॉंच झालंय आणि ते आजच दुपारी सोल्ड आऊट झालेलं आहे." मंगळसूत्राला मिळालेल्या भरघोस प्रतिसादाबद्दल तिने ग्राहक आणि चाहत्यांचे आभारही मानले. तसेच लवकरच हे मंगळसूत्र पुन्हा स्टॉकमध्ये उपलब्ध करून दिलं जाणार असल्याचंही तिने स्पष्ट केलं.

## अनीतचा ग्लॅमरस लूक!




अभिनेत्री अनीत पड्डा सध्या तिच्या आगामी वेब सीरीज 'हुंकार'मुळे चर्चेत आहे. या सीरीजचा ट्रेलर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला असून, अनीत सध्या सीरीजच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. त्याचदरम्यान तिने सोशल मीडियावर काही नवीन फोटो शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये तिचा वेगळा आणि आकर्षक लूक पाहायला मिळत आहे. अनीतच्या या फोटोंवर चाहत्यांनीही भरभरून प्रतिक्रिया दिल्या आहेत. अनीत पड्डाने आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर काही फोटो पोस्ट केले आहेत. या फोटोंमध्ये ती वेस्टर्न आउटफिटमध्ये दिसत आहे. तिने केस मोकळे ठेवले असून, साधा पण स्टायलिश लूक केला आहे. काळ्या रंगाच्या जुत्तीमुळे तिच्या लूकला वेगळा टच मिळाला आहे. तसेच तिने हलकी ज्वेलरी घातली आहे. एकूणच तिचा हा लूक साधा असूनही लक्ष वेधून घेणारा आहे. अनीतने हे फोटो शेअर करताना कॅप्शनमध्ये फक्त गुलाबाच्या फुलाचा इमोजी वापरला आहे. फोटो पोस्ट झाल्यानंतर काही वेळातच तिच्या चाहत्यांनी त्यावर कमेंट्सचा वर्षाव केला. अनेकांनी तिच्या लूकचे कौतुक केले आहे. एका यूजरने तिच्या आउटफिटची विशेष प्रशंसा केली. तर दुसऱ्या एका चाहत्याने 'हे भगवान, बहुत खूबसूरत' अशी कमेंट केली.

# रझाउल्लाहची विक्रमी फटकेबाजी!

## ८१ धावांच्या खेळीने पाकिस्तानला संकटातून बाहेर काढलं...

**महाईन्यूज । इंग्लंड**

**इंग्लंड आणि पाकिस्तान यांच्यात कसोटी मालिकेतील तिसरा आणि अखेरचा सामना खेळवला जात आहे. दोन सामने जिंकत इंग्लंडने मालिकेत अभेद्य आघाडी मिळवली आहे. यानंतर आता तिसऱ्या सामन्यात चांगली कामगिरी करत विजय मिळवणं यावर पाकिस्तानच्या नजरा आहेत आणि याची झलक पदार्पणवीर रझाउल्लाहच्या विक्रमी अर्धशतकी खेळीत पाहायला मिळाली. रझाउल्लाहने नवव्या क्रमांकावर फलंदाजीसाठी उतरत विक्रमी अर्धशतकी खेळी साकारली. यासह पाकिस्तानने फॉलोऑन मिळाल्यानंतर लढाऊ धावसंख्या उभारली आहे.**




बर्मिंगहॅमच्या एजबॅस्टन मैदानावर सुरू असलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावात, पाकिस्तानी गोलंदाज रझाउल्ला याने आपल्या आक्रमक फलंदाजीने खळबळ उडवून दिली. नवखा खेळाडू असूनही आणि नवव्या क्रमांकावर फलंदाजीला येऊनही, त्याने अवघ्या ४३ चेंडूंत अर्धशतक पूर्ण करत पाकिस्तानच्या कसोटी क्रिकेटच्या इतिहासात एक महत्त्वपूर्ण विक्रम नोंदवला.

रझाउल्लाह आता पाकिस्तानसाठी कसोटी पदार्पणाच्या सामन्यात सर्वात जलद अर्धशतक झळकावणारा फलंदाज ठरला आहे. इंग्लंडच्या वेगवान गोलंदाजांविरुद्ध मैदानावर चहूबाजूंनी चौकार-षटकारांची आतिषबाजी करत, त्याने ३ चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने हे अर्धशतक पूर्ण केलं. या धडाकेबाज खेळीसह




रझाउल्लाने अष्टपैलू खेळाडू फहीम अश्रफचा पूर्वीचा विक्रम मोडला. यापूर्वी, पाकिस्तानसाठी कसोटी पदार्पणाच्या सामन्यात सर्वात जलद अर्धशतक झळकावण्याचा विक्रम फहीम अश्रफच्या नावावर होता; त्याने २०१८ मध्ये डब्लिन येथे आयर्लंडविरुद्ध ५२ चेंडूंत ही कामगिरी केली होती.

दुसऱ्या डावात, शान मसूद आणि बाबर आझम बाद झाल्यानंतर पाकिस्तानची फलंदाजी पुन्हा एकदा डळमळीत झाली आहे. जेव्हा रझाउल्ला फलंदाजीसाठी मैदानात उतरला, तेव्हा पाकिस्तानने ३१८ धावांत आठ विकेट्स गमावल्या होत्या आणि संघ सर्वबाद होण्याच्या संकटात सापडला होता. अशा निर्णायक क्षणी रझाउल्लाने उत्कृष्ट फलंदाजी केली. यादरम्यान रझाउल्लाने मोहम्मद अब्बाससह नवव्या विकेटसाठी शतकी भागीदारी केली, ज्यामुळे पाकिस्तान संघाला १०० धावांहून अधिकची आघाडी मिळवता आली.

यासह रझाउल्लाहने ६३ चेंडूत ४ चौकार व विक्रमी ९ षटकारांसह ८१ धावा केल्या. रझाउल्लाहच्या ८१ धावांच्या खेळीसह पाकिस्तानने दुसऱ्या डावात एकूण ४४९ धावा केल्या. दिवसाअखेर रझाउल्लाह बाद झाल्याने त्याचं विक्रमी शतक मुकलं, पण ८१ धावा करत त्याने पाकिस्तानला संकटातून वाचवलं. आता पाकिस्तान संघाकडे १२९ धावांची आघाडी आहे. पाकिस्तानला जर तिसरा कसोटी सामना जिंकायचा असेल तर इंग्लंड संघाला लवकरात लवकर सर्वबाद करावं लागणार आहे.

# भारत-श्रीलंका तिसऱ्यांदा महिला आशिया चषक फायनलमध्ये भिडणार!

**महाईन्यूज । दुबई**

**महिला टी-२० आशिया चषक २०२६ चे दोन फायनलिस्ट संघ ठरले आहेत. भारताने बांगलादेशचा पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली. तर दुसरा सेमीफायनल सामना पाकिस्तान आणि श्रीलंका संघांमध्ये खेळवला गेला. पाकिस्तानला ४ विकेट्सने नमवत श्रीलंकेने अंतिम फेरीतील आपलं स्थान निश्चित केलं. आता आशिया चषकाचा अंतिम सामना कधी, कुठे आणि केव्हा खेळवला जाणार, जाणून घेऊया.**






दुसऱ्या उपांत्य सामन्यात, नाणेफेक गमावल्यानंतर पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत ५ बाद १३० धावा केल्या. याला प्रत्युत्तर देताना श्रीलंकेने १८.४ षटकांत ६ गडी गमावून विजयाचं लक्ष्य गाठलं. या पराभवामुळे पाकिस्तानचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे.

भारत आणि श्रीलंका संघांमध्ये महिला आशिया चषक २०२६ चा अंतिम सामना रंगणार आहे. हा अंतिम सामना १३ सप्टेंबरला रविवारी दुबईच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर होईल. हा सामना भारतीय वेळनुसार संध्याकाळी ८ वाजता खेळवला जाईल. तर सामन्याची नाणेफेक अर्धा तास आधी म्हणजे ७.३० वाजता होईल. आशिया चषकाचा अंतिम सामना हा सोनी स्पोर्ट्स या टीव्ही चॅनेलवर लाईव्ह पाहता येणार आहे. तर सोनी लिव्ह ॲपवर या सामन्याचं थेट प्रक्षेपण पाहता येईल.

श्रीलंका सलग तिसऱ्यांदा या अंतिम सामन्यात पोहोचली आहे आणि सलग तिसऱ्यांदा भारताविरूद्ध फायनल खेळणार आहे. भारत आणि श्रीलंका यापूर्वी २०२२ आणि २०२४ च्या अंतिम सामन्यांत आमनेसामने आले होते; २०२२ मधील फायनलमध्ये भारतीय संघाने विजय मिळवला होता, तर २०२४ मधील फायनलमध्ये श्रीलंकेने बाजी मारली होती. आता भारतीय संघाकडे श्रीलंकेविरुद्धच्या त्या पराभवाचा बदला घेण्याची संधी आहे. दंबुला येथे झालेल्या आशिया चषक २०२४ च्या अंतिम सामन्यात श्रीलंकेने भारताचा ८ गडी राखून पराभव करत दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावलं होतं. भारतीय संघाकडे टी-२० फॉरमॅटमध्ये चौथ्यांदा आणि विक्रमी आठव्यांदा आशिया चषक जिंकण्याची संधी आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper


। रविवार ।

दि. 13 सप्टेंबर 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती





# विद्यार्थ्यांच्या हातून साकारला पर्यावरणपूरक बाप्पा

## शाडू माती, नैसर्गिक साहित्याच्या वापरातून ‘प्लास्टिकमुक्त गणेशोत्सवा’चा संदेश

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पर्यावरण संवर्धनाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासोबतच गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने शहराच्या विविध भागांत जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ‘स्वच्छ सर्वेक्षण २०२६’ आणि ‘माझी वसुंधरा ७.०’ अभियानांतर्गत ‘ग’ क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग क्रमांक २३ मधील यशवंतराव चव्हाण विद्यालय, थेरगाव येथे विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी शाडू माती व नैसर्गिक साहित्याचा वापर करून गणेशमूर्ती साकारत पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश दिला.**





महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाकडून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत शहरात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि नागरिकांच्या सहभागाचा संदेश देण्यावर महापालिकेचा भर आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शाडू माती तसेच नैसर्गिक साहित्याचा वापर करून गणेशमूर्ती तयार केल्या तसेच, यावेळी पुनर्वापर करता येणाऱ्या साहित्यापासून सजावट करण्याचे आवाहन करण्यात आले. कागद, कापड, बांबू, पाने आणि नैसर्गिक फुलांचा वापर करून सजावट करण्यास प्रोत्साहन देण्यात आले. तसेच थर्माकोल आणि एकदा वापरून फेकून देण्यात येणाऱ्या प्लास्टिकचा वापर टाळण्याबाबत विद्यार्थी व शिक्षकांमध्ये जनजागृती देखील करण्यात आली.

“गणेशोत्सव हा श्रद्धा, संस्कृती आणि उत्साहाचा सण आहे. हा उत्सव साजरा करताना पर्यावरणाचे संवर्धन करण्याची जबाबदारीही आपली आहे. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती, नैसर्गिक सजावट आणि प्लास्टिकमुक्त उत्सवाचा संदेश घराघरांत पोहोचण्यास मदत होईल. लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक सवयी रुजल्यास त्याचा सकारात्मक परिणाम पुढील पिढीवरही होईल,” असे उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

यावेळी सहा.आरोग्य अधिकारी अतुल सोनवणे, आरोग्य निरीक्षक गोपाल धस, आरोग्य सहाय्यक सचिन उघडे तसेच मुख्याध्यापक शिवाजी दौंडकर हे देखील उपस्थित होते.

# UCMAS गणित स्पर्धेत पिंपरीतील अर्पिता छाजेडचे उज्ज्वल यश

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आर. के. एल. इंटरनॅशनल स्कूलमधील इयत्ता ६ वी (जॅस्मिन विभाग) मधील विद्यार्थिनी कु. अर्पिता नरेश छाजेड हिने प्रतिष्ठित 'UCMAS' मानसिक गणित स्पर्धेत राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करत शाळेच्या आणि पिंपरी-चिंचवड परिसराच्या लौकिकात मोलाची भर घातली आहे. अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या या स्पर्धेत अवघ्या ८ मिनिटांत २०० गणिते अचूक सोडवून अर्पिताने आपल्या अफाट बौद्धिक क्षमतेची आणि मानसिक चपळतेची चुणूक दाखवून दिली.**




राज्यस्तरीय चॅम्पियन अवॉर्ड: २५ जानेवारी २०२६ रोजी बी.एम. सी.सी. कॉलेज, पुणे येथे पार पडलेल्या १९ व्या UCMAS पुणे राज्यस्तरीय स्पर्धेत अर्पिताने H-2 श्रेणीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत थेट 'चॅम्पियन अवॉर्ड'वर आपले नाव कोरले. नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये ५ वा क्रमांक ५ सप्टेंबर २०२६ रोजी सिडको कन्व्हेन्शन हॉल, वाशी (नवी मुंबई) येथे २५ वी UCMAS नॅशनल चॅम्पियनशिप आयोजित करण्यात आली होती. देशभरातील २४ राज्यांतील तब्बल ८,००० हून अधिक विद्यार्थ्यांचा या स्पर्धेत सहभाग होता. या कडक स्पर्धेत अर्पिताने L1 श्रेणीमध्ये संपूर्ण भारतात ५ वा क्रमांक (ALL INDIA 5TH RANK) मिळवून ऐतिहासिक यश संपादन केले.

UCMAS मधील या उल्लेखनीय प्रवासात अर्पिताने उत्कृष्ट एकाग्रता, अचूकता आणि तीव्र स्मरणशक्तीचे प्रदर्शन केले आहे. तिने मिळवलेल्या या घवघवीत यशामुळे शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही गणितासारख्या विषयात अधिक मेहनत घेण्याची आणि प्रगती करण्याची मोठी प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. तिच्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन, शिक्षक, नातेवाईक व परिसरातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

> “कु. अर्पिता छाजेड हिने अवघ्या ८ मिनिटांत २०० गणिते अचूक सोडवून UCMAS राष्ट्रीय स्पर्धेत मिळवलेला ५ वा क्रमांक हा संपूर्ण पिंपरी-चिंचवड परिसरासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. तिची ही अफाट बुद्धिमत्ता, प्रचंड एकाग्रता आणि केलेली मेहनत खरोखर वाखाणण्याजोगी आहे. अर्पिताच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, तिच्या या कामगिरीमुळे इतर विद्यार्थ्यांनाही अभ्यासात व स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्याची मोठी प्रेरणा मिळेल. शाळा परिवारातर्फे मी तिचे मनापासून कौतुक करतो आणि पुढील उज्ज्वल भविष्यासाठी उदंड शुभेच्छा देतो.
>
> **- डॉ. पुष्कर चौबे, सीईओ, आर. के. एल. गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल.**

# महापालिका शाळांच्या विकासाला गती!

## शिक्षण सभापती रविना आंघोळकर यांच्याकडून शाळांची प्रत्यक्ष पाहणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाला अधिक गतिमान आणि विद्यार्थीकेंद्रित बनवण्यासाठी शिक्षण सभापती रविना आंघोळकर यांनी शहरातील विविध महापालिका शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन सविस्तर पाहणी सुरू केली. शाळांच्या इमारतींची दुरुस्ती, पिण्याची पाणी व्यवस्था, विद्यार्थ्यांची वाढती पटसंख्या, शिक्षणाचा उच्च दर्जा आणि विद्यार्थ्यांचे आरोग्य या प्रमुख मुद्यांवर त्यांनी शाळा प्रशासनाशी सविस्तर चर्चा केली. या सकारात्मक आणि मार्गदर्शक भेटीमुळे महापालिका शाळांमध्ये एक नवी ऊर्जा निर्माण झाली आहे.**



शाळांच्या प्रत्यक्ष पाहणीदरम्यान सभापती रविना आंघोळकर यांनी वर्गखोल्या, शाळा परिसर, खेळण्याचे मैदान आणि इमारतींच्या दुरुस्तीच्या कामांचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी उत्तम आणि सुरक्षित भौतिक वातावरण मिळावे, यासाठी आवश्यक त्या दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. याशिवाय, शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी शुद्ध व मुबलक पिण्याची पाणी व्यवस्था उत्तम स्थितीत असल्याबाबत त्यांनी पाहणी केली आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याचे निर्देश दिले.

महापालिका शाळांमधील दर्जेदार शिक्षणामुळे पालकांचा कल वाढू लागला असून, याच प्रक्रियेला अधिक वेग देण्यासाठी पटसंख्या वाढवण्यावर विशेष भर देण्याचे आवाहन सभापतींनी केले. केवळ विद्यार्थी संख्या वाढवणे नव्हे, तर शिक्षणाचा दर्जा उंचावून विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या युगात टिकणारे गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर भर दिला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासोबतच त्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारे उपक्रम राबवावेत, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

शिक्षण सभापतींच्या या व्यापक पाहणी दौऱ्यामुळे महापालिका शाळांच्या कामकाजात अधिक सुसूत्रता आली असून, विद्यार्थी हितैषी उपक्रमांना गती मिळणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी हा दौरा मैलाचा दगड ठरणार असल्याचा विश्वास यानिमित्ताने व्यक्त होत आहे.



“ पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना सर्वोत्तम सुविधा आणि दर्जेदार शिक्षण देणे हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. शाळांच्या इमारतींची दुरुस्ती, पिण्याची शुद्ध पाणी व्यवस्था आणि विद्यार्थ्यांचे आरोग्य याविषयी आम्ही अत्यंत कटाक्षाने लक्ष देत आहोत. पालकांचा विश्वास सार्थ ठरवत महापालिका शाळांमधील पटसंख्या वाढवण्यासाठी आणि शिक्षणाचा स्तर उंचावण्यासाठी शिक्षण विभाग कटिबद्ध आहे. यापुढेही शाळांच्या विकासासाठी अशाच प्रकारे प्रत्यक्ष पाहणी करून ठोस निर्णय घेतले जातील.

**- रविना आंघोळकर, शिक्षण सभापती, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

# IIBM कॉलेजमध्ये 'फ्रेशर्स पार्टी' उत्साहात साजरी; 'प्रारंभ' मासिकाचे अनावरण




**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आय आय बी एम कॉलेज ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंटतर्फे प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'फ्रेशर्स पार्टी'चे (स्वागत समारंभ) आयोजन चिखली येथील इंद्रप्रस्थ हॉलमध्ये मोठ्या जल्लोषात करण्यात आले. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी आणि बॉलिवूड वेशभूषेने उपस्थितांची मने जिंकली. याच कार्यक्रमादरम्यान संस्थेच्या "प्रारंभ" या नव्या मासिकाचे अनावरण करण्यात आले.**

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने झाली. या प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. धनंजय वर्णेकर, संचालिका व नगरसेविका सौ. शीतल वर्णेकर, प्राचार्य प्रा. प्रदीप फुलकर, विभाग प्रमुख अमोल भागवत, प्रतीक्षा डफळ, प्रा. अनिकेत वंजारी, संदीप जाधव यांच्यासह सर्व को-ऑर्डिनेटर व प्राध्यापक वृंद उपस्थित होते.

डॉ. धनंजय वर्णेकर यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअरविषयक मोलाचे मार्गदर्शन केले, तर प्राचार्य प्रा. प्रदीप फुलकर यांनी हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील यशाचा मूलमंत्र दिला. विभागप्रमुख अमोल भागवत यांनी "ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी संस्था सदैव सोबत आहे" असा विश्वास देत विद्यार्थ्यांचे स्वागत केले. विभागप्रमुख प्रतीक्षा डफळ यांनी विद्यार्थ्यांच्या वेशभूषेचे कौतुक करत त्यांना आत्मविश्वासाने पुढे जाण्याचे प्रोत्साहन दिले.

हा सोहळा अतिशय उत्साहात आणि आनंददायी वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मिलिंद उशीर यांनी केले, तर प्रा. श्रीनिवास यांनी आभार मानले.

### 'प्रारंभ' मासिकाचे अनावरण

या वर्षापासून सुरू करण्यात आलेल्या "प्रारंभ" या मासिकाची अधिकृत घोषणा करून मान्यवरांच्या हस्ते हस्त-पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले. "विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना आणि व्यावसायिक यशाला व्यक्त करणारे हे एक नवे दालन ठरेल," असे उद्गार प्रा. अनिकेत वंजारी यांनी काढले.


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway Station